T2|498|2017.

<u>अत्यंत तातडीचे</u>

ISO 9001 : 2008 Certification
प्राप्त महानगरपालिका

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.
नागरी सुविधा केंद्र,
क्र.नासुकें/१/कावि/239/२०१७
दि. 10/०७/२०१७

**विषय :- महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ ची प्रभावीपणे अंमलबजावणी करणेबाबत...**

**परिपत्रक,**

प्रशासनामध्ये उत्तरदायित्व, जबाबदारी व पारदर्शकता आणण्यासाठी, कार्यक्षम व समयोचित लोकसेवा देण्याची तरतूद करण्याकरिता महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ दि.२८/४/२०१५ रोजी लागू केला आहे. या अधिनियमानुसार शासनाकडील शासन निर्णय क्रमांक: एमसीओ-२०१५/प्र.क्र.१८९/नवि-१४ दि.२३/०६/२०१५ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिका पुरवित असलेल्या लोकसेवा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व व्दितीय अपिलीय प्राधिकारी आणि नियत कालमर्यादा बाबतची अधिसूचना क्र.नासुके/१/कावि/२४६/२०१५ दि.१५/७/२०१५ अन्वये प्रसिध्द करणेत आली आहे.

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ ची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याकरीता मा.श्री.स्वाधीन क्षत्रीय, राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली दि.०६/०७/२०१७ रोजी पार पडलेल्या बैठकिनुसार संबंधित विभागप्रमुखांना पुढील सूचना देणेत येत आहेत.

१) महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ कलम ३(२) नुसार विभागाकडून पुरविण्यात येणा-या लोकसेवा, आवश्यक कागदपत्रे, फी, नियत कालावधी, त्या लोकसेवेंशी संबंधित पदनिर्देशित अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी व व्दितीय अपिलीय प्राधिकारी याबाबतची माहिती संबंधित विभागांनी त्यांचे अधिनस्त कार्यालय / विभागाच्या सूचना फलकावर (दर्शनी भागावर) प्रसिद्ध करावी.

२) सर्व संबंधित विभाग प्रमुखांनी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत समाविष्ट होणाऱ्या सर्व सेवांचा दैनंदिन आढावा घ्यावा व सर्व अर्ज विहीत कालावधी मध्ये निकाली काढले असले बाबत खात्री करावी. विहीत कालावधीमध्ये प्रकरणे निकाली निघाली नसल्यास पुढील दोन दिवसांत सदर प्रकरणे निकाली काढावीत व प्रत्येक आठवडयात होणाऱ्या विभागप्रमुखांच्या बैठकित याबाबतचा आढावा घेणेत येणार आहे.

३) महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत देणेत येणाऱ्या सेवांसंबंधीचे आजपर्यंतचे सर्व अर्ज संगणक प्रणालीव्दारे ऑनलाईन पद्धतीने घेणेत आले असल्याची खात्री करावी व जे अर्ज अद्‌याप पर्यंत ऑफलाईन स्वरुपात घेणेत आलेले असतील असे अर्ज तात्काळ संगणक प्रणालीव्दारे ऑनलाईन स्वरुपात घेणेत यावेत.

...२

४) महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत नागरीकांना १५ सेवांव्यतिरिक्त आणखी नव्याने कोणत्या सेवा समाविष्ट करता येतील अशा सेवांबाबत विभाग प्रमुखांनी तात्काळ नागरी सुविधा केंद्र विभागास कळवावे, जेणेकरुन शासनास त्यासंबंधी कळविता येईल. (उदा.बांधकाम परवानगी देणेकामी उद्यान विभागाकडील ना हरकत दाखला, भोगवटा प्रमाणपत्र इत्यादी)

५) बांधकाम परवानगी विभाग, नगररचना विभाग व पाणीपुरवठा विभाग यांच्याकडील प्रलंबित प्रकरणांची संख्या इतर विभागांपेक्षा जास्त आहे. त्यामुळे त्यांनी पुढील दोन दिवसांत सदर प्रकरणे निकाली काढावीत व आपल्याकडील माहितीसह पुढील आठवडयात विभागप्रमुखांच्या आढावा बैठकिस उपस्थित रहावे.

६) महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत देण्यात येणाऱ्या सेवांविषयी प्रत्यक्ष कार्यालयात जाऊन पाहणी मध्ये मुदतबाह्य प्रकरणे आढळल्यास अथवा कोणत्याही प्रकारच्या विलंबास सदर अधिनियमांतर्गत र.रु.५००/- ते र.रु.५०००/- पर्यंत दंडात्मक कारवाई करणेची तरतूद आहे, याची संबंधितांनी स्पष्ट नोंद घ्यावी.

७) महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत विभागप्रमुखांनी दर आठवडयाच्या शेवटी आढावा घेऊन विहीत मुदतीत अर्ज / प्रकरण निकाली निघेल याची दक्षता घ्यावी.

सबब, महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत सर्व संबंधित विभागप्रमुखांनी वरील सूचनांचे काटेकोरपणे पालन होणेसंबंधी आपले स्तरावर योग्य ती कार्यवाही करावी.

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११०१८

प्रति,

------------------------------------ विभाग